| MHKO120000742026 | किरकोळ फौजदारी खटला क्र. ०६/२०२६<br>प्रमोद प्रकाश मोरेकर<br>वि.<br>संतोष रमेश मोरेकर |
|---|---|

**निशाणी क्र.१ व ४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीने आरोपीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये कारवाई व्हावी याकरीता दिला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये फिर्यादीने असे कथन केले आहे की, फिर्यादी हे शिवडाव, ता. भुदरगड येथील रहिवासी आहेत. फिर्यादी यांचे बँक ऑफ इंडिया, शाखा पाटगाव या बँकेमध्ये बचत खाते आहे व त्या अनुषंगाने बँकेमार्फत फिर्यादीला पासबुक, ए.टी.एम., धनादेश प्राप्त झाले होते. सदर धनादेश मधील धनादेश क्र. ०२२३०१ पासून सुरू होतात. सदरचे पासबुक, धनादेश, ए.टी.एम., हे फिर्यादीने एका प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवले होते व त्यामध्ये फिर्यादीच्या वडीलांचे नावे घेतलेला एक कोरा स्टॅम्प देखील होता.

३. फिर्यादीने अर्जामध्ये पुढे असे कथन केले आहे की, फिर्यादी यांनी संबंधित पासबुक व पिशवीतील अन्य कागदपत्रे मिळून आली नाही, म्हणून, फिर्यादीने शोधाशोध केली व त्यानंतर फिर्यादीची पिशवी गहाळ अथवा चोरी झाल्याची खात्री फिर्यादीला झाली व त्यामुळे फिर्यादीने संबंधित पोलीस ठाण्याकडे दि.०५/०६/२०२५ रोजी लेखी तक्रारी अर्ज केला. तसेच, संबंधित बँकेकडे देखील दि.०४/०६/२०२५ रोजी लेखी स्वरुपात कळविले. प्रस्तुत आरोपीच्या वतीने फिर्यादीला धनादेशाची मागणी नोटीस दि.०१/१०/२०२५ रोजी प्राप्त झाली व त्यामुळे फिर्यादीला असे समजले की, प्रस्तुतच्या बँक खात्याचा धनादेश चोरी गेला व धनादेश क्र. ०२२३०१ ते ०२२३०५ असे पाच धनादेश प्रत्येकी ५ लाख रक्कम

टाकून ते धनादेश वटविण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता, धनादेश कधीही प्रस्तुतच्या फिर्यादीने प्रस्तुतच्या फिर्यादीला दिला नव्हता व त्यामुळे प्रस्तुतचा धनादेश चोरुन आरोपीने फिर्यादीची फसवणूक केली आहे. पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही, म्हणून मा. पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयात देखील दि.२२/११/२०२५ रोजी रितसर तक्रारी अर्ज दाखल केला, परंतु, तरी देखील पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये तपासासाठी पोलीस स्टेशनला तपास करण्याचे आदेश पारित व्हावेत, अशी विनंती फिर्यादीने केली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) चे तरतुदीचे अवलोकन केले व पुढील कारवाई करावयाची का नाही, याबाबत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये पोलीसांचे म्हणणे ऐकणे जरुरीचे वाटले. त्यामुळे पोलीस स्टेशनला नोटीस काढली. संबंधित पोलीसांनी त्यांचे म्हणणे सादर केले व त्यामध्ये असे कथन केले आहे की, पोलीसांना चौकशी केल्यावर धनादेश चोरलेले नव्हते व मोबदला देण्यासाठी दिले होते, असे त्यांना दिसून आले. प्रस्तुतच्या फिर्यादीला चौकशीसाठी बोलाविले होते. त्यांनी काहीही सांगितले नाही, म्हणून, त्यांचा अर्ज फाईल करण्यात आला, असे सांगितले. त्यामुळे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१६(२), ३२८(४), ३३६(३) व कलम ३३८ बाबत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.

४. फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी त्यांचे युक्तिवादाच्या अनुषंगाने खालील न्यायनिर्णयावर या न्यायालयाचे लक्ष वेधले. **Sadiq B. Hanchinmani Vs. State of Karnataka & Ors. 2025 DGLS(SC)1369** सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा घडलेला आहे असे दिसून येत असेल व खोटे कागदपत्र बनवले हे दिसून येत असेल तर अशा परिस्थितीमध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम १५६(३) चा आदेश करणे उचित आहे.

५. प्रस्तुतच्या अर्जामध्ये पोलीसांनी दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, मोबदल्या पोटी धनादेश दिला होता व त्यावरून प्रथमदर्शनी फिर्यादीची फसवणूक आरोपीने केली आहे, असे वाटत नाही. विशेषतः धनादेश चोरला आहे या आरोपामध्ये देखील प्रथमदर्शनी तथ्य वाटत नाही, परंतु, असे जरी असले तरी प्रस्तुतची फिर्यादी ही फिर्यादीने न्यायालयामध्ये २९/०१/२०२६ रोजी दाखल केली आहे व फिर्याद दाखल करण्यास देखील फिर्यादीने विलंब केला आहे. तसेच, पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ (Negotiable Instrument Act, 1881) चे कलम ८ नुसार ज्या व्यक्तीच्या नावे धनादेश असतो व तो व्यक्ती हा धनादेशाचा धारक आहे, असे समजले जाते व कलम ९ नुसार तो त्या धनादेशाचा धारक हा एखाद्या मोबदल्यासाठी तो धनादेश त्याच्याकडे आला (holder in due course) असे समजले जाते. याही पलीकडे संबंधित कायद्याचे कलम ११८(अ) नुसार जोपर्यंत विरुद्ध परिस्थिती सिद्ध होत नाही तोपर्यंत हे ग्राह्य धरले जाईल की, कोणताही धनादेश हा मोबदल्यासाठी दिला गेला आहे. तसेच, संबंधित कायद्याचे कलम १३९ नुसार जोपर्यंत विरुद्ध परिस्थिती सिद्ध होत नाही तोपर्यंत असे ग्राह्य धरले जाईल की, ज्या व्यक्तीच्या लाभामध्ये धनादेश दिला गेला होता तो धनादेश हा एखादे देणे बाकी असलेली रक्कम अथवा एखादे दायित्व फेडणेपोटी दिला होता, या बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी आरोपीने फिर्यादीची फसवणूक केली व खोटे कागदपत्र बनविले व फौजदारी न्यासभंग केला या आरोपामध्ये तथ्य वाटत नाही. **Sadiq B. Hanchinmani** या न्यायनिर्णयातील प्रमाणाचा आदर राखुन या न्यायालयाचे असे मत आहे की, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाणात सांगितले प्रमाणे दखलपात्र गुन्हा घडला आहे, असे प्रथमदर्शनी वाटत नाही. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये तपासासाठी प्रकरण पाठविण्यामध्ये तथ्य वाटत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

## **आदेश**

१. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये तपासासाठी प्रकरण पाठविण्याची मागणी नामंजूर करण्यात येते.

२. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अन्वये फिर्यादीने त्याचे सत्यापन नोंदविणेकामी पुढील तारखेस हजर रहावे, असा निर्देश देण्यात येतो.

NISHANT DIPAK RUDRABHATE
Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.04.04 19:58:52 +0530

(एन. डी. रुद्रभटे)

**दिनांक :** ०४/०४/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गारगोटी